भिंती तोडल्या.

काळ्या विद्यार्थ्यांचा संघर्ष

मार्क एंथनी

चित्र: एलीन लुकास

मराठी : अश्विनी बर्वे





भिंती तोडल्या

काळया विद्यार्थांचा संघर्ष

मार्क एंथनी

चित्र एलीन लुकास

लेखकाची नोट

काही वर्षांपूर्वी पर्यंत कायद्याने अनेक ठिकाणी काळे आणि गोरे अमेरिकन वेगवेगळे होते. याला "सेग्रीगेशन" किंवा "रंग-भेद" म्हंटले जात असे. प्रतीक्षालयात आणि पाणी पिण्याचे नळ, बस आणि बाजारात, हॉटेल मध्ये " फक्त गोरे" अशी पाटी लिहलेली असे "फक्त काळे " अशी पाटी फक्त लहान, घाणेरड्या ठिकाणी असे गोऱ्या मुलांसाठी आणि काळ्या मुलांसाठी वेगवेगळ्या शाळा होत्या. काळ्या मुलांच्या शाळा नेहमी जुन्यापुराण्या आणि छोट्या असत. काळ्या मुलांना त्या पुस्तकांचा वापर करावा लागे जी पुस्तके गोऱ्या मुलांच्या शाळांना नको असत.

१९५४ मध्ये, अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की "रंग-भेद" मुळे वेगवेगळ्या शाळा ठेवणे चुकीचे आहे. मुलांना वेगळे ठेवू शकत नाही आणि केवळ त्यांच्या त्वचेचा रंगामुळे त्यांना चांगल्या शिक्षणापासून वंचित ठेवले जाऊ शकत नाही.

१९५७ मध्ये, लिटिल रॉक, अर्कांसस मध्ये नऊ काळ्या मुलांना गोऱ्या मुलांच्या शाळेत सेंट्रल हाई मध्ये स्थानांतरित केले गेले. त्यांना "लिटिल रॉक नाइन" च्या नावाने ओळखले जाई. ही त्या काळ्या मुलांची गोष्ट आहे.



लिटिल रॉक, अर्कांससमध्ये एक कार हळूहळू
एका शांत रस्त्यावरून पुढे गेली.

ड्रायव्हरने योग्य घराचा शोध घेतला, आणि
जेव्हा ते सापडले तेव्हा कार हळू झाली.

हे एल. सी. आणि डेज़ी बेट्सचे घर होते.

ते जवळच्या शहरामध्ये एका आफ्रिकी –
अमेरिकेच्या वर्तमानपत्राचे मालक होते.

अचानक कारच्या आत कोणीतरी दगड फेकला.

त्यामुळे बेट्सच्या घराच्या समोरची खिडकी
चक्काचूर झाली.

काच फुटण्याच्या आवाजानंतर कुत्री भुंकायला लागली आणि मुलं रडायला लागली.

आणि कारमध्ये बसलेले लोक हसत वेगाने दूर निघून गेले.

पण घरात कोणी हसले नाही.

दगडाने डेज़ी बेट्सला जवळजवळ मारलं कारण ती फक्त सोफ्यावर बसून राहिली.

त्यांनी फरशीवर पडलेल्या काचांचे तुकडे बघितले.

तिला माहीत होते की दगड फेकणाऱ्याना तिला भीती दाखवायची होती.

त्यांना वाटे डेज़ीने त्या काळ्या विद्यार्थींना मदत करणे बंद करावे जे सेंट्रल हाई स्कूलमध्ये जाणार होते.

पण ती घाबरली नाही. तिने त्या विद्यार्थींना मदत करून ‘रंग-भेद’ नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

तिने तो कायदा ज्यामुळे काळे आणि गोरे वेगळे केले, तो काढून टाकण्याचा प्रयत्न केला.






सेंट्रल हाई स्कूल एक मोठी शाळा होती.

त्याचे क्षेत्रफळ शहराचा पूर्ण एक ब्लॉक बरोबर होते.

शाळा पाच मजल्यांची होती आणि त्यात दोन हजार पेक्षा अधिक विद्यार्थी होते.

आता त्यांच्यातले नऊ मुलं काळे असणार होते.



त्यातला एक अर्नेस्ट ग्रीन होता..

ते त्याचे हाई स्कूलचे शेवटचे वर्ष होते.

त्याला सेंट्रलमधून ग्रॅज्यूएट व्हायचे होते.



इतर सहा विद्यार्थी अकरावीत होते.

मिनिजियन ब्राउन एक मज़ेदार मुलगी होती.
तिला लोकांना हसवायला आवडे.

तिला गायला पण आवडे.



टेरेंस रॉबर्ट्स हसतमुख आणि स्मार्ट होता.

त्याच्याजवळ नेहमी काहीतरी सांगायला असे जे ऐकून लोक हसत.

एलिजाबेथ एकफोर्डला शिवन आवडे.

शाळा सुरु होण्याची वाट बघत असतांना तिने आपल्यासाठी एक नवीन ड्रेस शिवला होता.



थेल्मा मदरशेड लहान आणि पातळ होती
आणि तिचे हृदय कमकुवत होते. पण त्याचं
मन खूप कुशाग्र होतं.

ग्लोरिया रे तिच्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या
गोष्टींबद्दल शांतपणे बोलत असे.



मेलबा पाटीललो सुंदर होती आणि तिने बऱ्याच
गोष्टी चांगल्या केल्या.

सेंट्रलमध्ये "पाच मजली संधी" त्याची वाट
पाहत आहेत हे त्याला माहीत होते.



जेफरसन थॉमस आणि कार्लोटा वॉल्स, दहावीत होते.

जेफ आपल्या जुन्या शाळेतील सगळ्यात वेगाने धावणारा धावपटू होता.

कार्लोटा, छात्र परिषदेत होती.

सर्व नऊ विद्यार्थांचा व्यवहार चांगला होता आणि ते मेहनती होते.

ते सर्व सेंट्रल हाई स्कूलमध्ये जाण्यासाठी उत्साहित होते.

त्यांना माहीत होते की तिथे त्यांना शाळेच्या संघात आणि क्लबमध्ये सामील होण्याची अनुमती मिळणार नाही.

मिनिजियन, संगीत क्लबमध्ये गाऊ शकणार नाही.

जेफ, धावण्याच्या टीममध्ये सामील होऊ शकणार नाही.

अर्नेस्ट, बैंडमध्ये आपला सैक्सोफ़ोनवाजवू शकणार नाही.

काळी मुलं फक्त वर्गात जाऊन शिकू शकतील.

“पण ते त्यातल्या त्यात एक मोठी गोष्ट आहे.” अर्नेस्टने आपल्या दुसऱ्या मित्रांना प्रोत्साहित करण्यासाठी म्हटले.



दक्षिणेतले अनेक लोकांना "रंग-भेद" चा अंत व्हावा असे वाटत नव्हते.

ते काळ्या मुलांना, गोऱ्या मुलांच्या बरोबर शाळेत बसवू इच्छित नव्हते. त्यांच्यातले काही गोरे लोक याबाबत अर्कांससचे गव्हर्नर ओरवल फॉबसयांच्याशी चर्चा करण्यासाठी गेले.



मजदूर दिनी गव्हर्नर फॉबस यांनी रेडीओ आणि टीव्हीवर आपला संदेश ऐकवला.

त्यांनी सांगितले की सेंट्रल हायस्कूलच्या बाहेर सैनिक तैनात असतील.

त्यांनी हे ही सांगितले की काळे विद्यार्थी सेन्ट्रल शाळेत येणार नाहीत.

“बघा, गव्हर्नर आपला त्रास वाढवत आहे,” मेल्बाची आजी म्हणाली.



मेल्बाची आजी बरोबर होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी सेंट्रल हायस्कूलच्या समोर लोकांची गर्दी झाली.

इमारतीच्या चारी बाजूला हेल्मेट घालून आणि बंदुक घेऊन सैनिक चुपचाप उभे होते.

असे वाटत होते की जसेकाही युद्धाची तयारी चालू आहे. सेन्ट्रल हायस्कूल मध्ये लढाई होणार का?

त्यादिवशी फक्त गोरे विद्यार्थीच शाळेत आले.

काळे विद्यार्थी आप-आपल्या घरात थांबले.

त्यांना कोणताही त्रास नको होता.

पण त्यांना चांगले शिक्षण हवे होते.

आणि आता सेंट्रल हायला काळ्या विद्यार्थांचीसुद्धा शाळा समजली जात होती.

त्या रात्री, मिसेज़ बेट्स यांनी एलिजाबेथला सोडून बाकी सगळ्या विद्यार्थींना फोन केला.

एलिजाबेथच्या परिवाराकडे फोन नव्हता.

मिसेज़ बेट्स दुसऱ्या दिवशी एलिजाबेथच्या घरी जाण्याचा प्रयत्न केला.

त्यांनी बाकी मुलांना सकाळी सेन्ट्रल स्कूलच्या काही अंतरावर भेटण्यास बोलावले.

मग मिसेज़ बेट्स त्यांच्याबरोबर शाळेत गेली. बुधवारी सकाळी, नऊ पैकी सात विद्यार्थी ठरवल्यानुसार भेटले.

त्यांच्या पुढे चर्चेचे दोन पाद्री होते. त्यांच्यातला एक गोरा आणि दुसरा काळा होता.

.





जसे काळे विद्यार्थी शाळेजवळ पोहचले. त्यांनी लोकांची गर्दी बघितली. गर्दीच्या चेहऱ्यावर राग आणि संताप होता. लोक त्यांच्यावर ओरडत होते आणि त्यांना शिव्या देत होते.


पण विद्यार्थी तरीही चालत होते.

विद्यार्थी जेव्हा सैनिकांच्या जवळ पोहचले तेव्हा त्यांनी विद्यार्थांना घरी जाण्यास सांगितले.

विद्यार्थांना सांगितले की ते शाळेत जाऊ शकत नाही. दुःखाची गोष्ट अशी विद्यार्थी मागे फिरले आणि गेले.

मेल्बा पैटिलो अजूनही सभेच्या ठिकाणी पोहचली नव्हती. रागवलेले गोरे लोकांनी तिला आणि तिच्या आईला पळवून लावले.

मग आई-मुलींना घरी परतावे लागले.






एलिजाबेथ एकफोर्डचे हाल तर अजूनच वाईट होते.

तिला दुसऱ्याबरोबर कुठे भेटायचे त्याचा निरोप मिळाला नव्हता.

आपल्या कुटुंबांबरोबर प्रार्थना केल्यावर, ती स्वतः शाळेत जाण्यासाठी बस मध्ये बसली. जेव्हा ती बस मधून उतरली तेव्हा तिला फक्त चिडलेल्या गोऱ्या लोकांची गर्दी दिसली. तेव्हाच तिला शाळेजवळ उभे असणारे सैनिक दिसले.




जशी एलिजाबेथ सैनिकांच्या जवळ गेली,
कोणी तिच्या कपड्यावर शाई शिंपडली.
एक स्त्री तिच्या चेहऱ्यासमोर येऊन जोरात
ओरडली. एलिजाबेथने रागवलेल्या आवाजांकडे
दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न केला. तिला आपली
भीती दाखवायची नव्हती.



शेवटी, ती सैनिकांकडे पोहचली. सैनिकांनी तिला पुढे जाऊ देण्या ऐवजी तिचा रस्ता रोखला. त्यांनी तिच्यावर आपल्या बंदुका रोखल्या.

सैनिक तिच्या बाजूचे नव्हते..



उन्हासाठी वापरलेल्या गॉगलच्या मागे एलिझाबेथचे डोळे भरून आले.

ती मागे फिरली आणि तिथून निघून आली.

गर्दीतल्या लोकांनी तिला दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. कोणी ओरडले, “तिला पकडा!”




एलिजाबेथने थोडेसे पुढे रस्त्यावर एक बस स्टॉप बघितला.

ती तिथे गेली आणि एका बाकावर बसली.

तिच्या शेजारी एक दयाळू माणूस बसला होता.

“तू त्यांना तुझे रडू दाखवू नकोस,” तो माणूस म्हणाला. जेव्हा बस आली तेव्हा एक महिला एलिजाबेथला मदत करायला पुढे आली. ती एलिजाबेथला तिथं घेऊन गेली जिथे एलिजाबेथची आई काम करत होती.



तीन आठवड्यापर्यंत सैनिकांनी आणि संतापलेल्या गर्दीने काळ्या विद्यार्थांना सेन्ट्रल हायस्कूलच्या बाहेर ठेवले.

विद्यार्थांना आपल्या शाळेचे काम डेज़ी बेट्सच्या घरीच करावे लागले.


त्यांच्यासाठी नवीन शाळा सोडून आपल्या जुन्या शाळेत जाणं सोप्पं होते.पण त्यांना माहीत होते की ते जे करत आहेत ते योग्य आहे.


मग एक दिवस सैनिक निघून गेले.

“पुढे काय होईल?" एलिजाबेथने विचारले.

“शाळेसाठी तयार व्हा,” मिसेज़ बेट्स म्हणाल्या.

नेहमीसारखी शाळेच्या समोर दरवाज्यावर लोकांची गर्दी जमली होती. पोलिसांनी काळ्या विद्यार्थ्यांना एका दुसऱ्या दरवाज्याने जायला सांगितले. जिथे गर्दी त्यांना बघू शकणार नव्हती..






आत, लोकांनी विद्यार्थ्यांना त्याचा वर्ग शोधण्यासाठी मदत केली.

थेल्माची तब्येत ठीक नव्हती. कोणी तिला ऑफिसमध्ये घेऊन गेले. पण थेल्माला घरी जायचे नव्हते. तिने शाळेत आत जाण्याची खूप वेळ वाट बघितली होती.

“मी आता हार मानणार नाही,” ती म्हणाली.



जेव्हा गर्दीला कळले की काळे विद्यार्थी आत गेले आहेत, तेव्हा त्यांना खूप राग आला.

त्यांनी बाहेर उभ्या असणाऱ्या पत्रकारांना मारलं. विद्यार्थी आपल्या वर्गात बसून पत्रकारांचे दुःखित आवाज ऐकत होते.

पोलीसप्रमुखाला भीती होती की अजून काही लोक जखमी होऊ नये.त्यांनी काळ्या विद्यार्थांना घरी जायला सांगितले. शाळेच्या खालच्या गॅरेजमध्ये काळे विद्यार्थी पोलिसांच्या गाडीत बसले.

“खाली उतरा आणि तिथेच थांबा,”पोलीस प्रमुख म्हणाला. “रस्त्यात कुठेच थांबू नका,” पोलीस प्रमुखाने ड्रायव्हरला सांगितले.

गाड्या जोरात धावल्या. काही तास विद्यार्थी सेन्ट्रल हायस्कूलमध्ये थांबले. पण त्यांना तिथेच थांबायला दिले नाही.



देशभरच्या बातम्यांमधून या घटनेच्या बाबत चर्चा झाली. त्यामुळे अनेक अमेरिकन नाराज झाले. त्यांनी विद्यार्थांना पत्र लिहून आपल्या शहरातल्या शाळेत येण्यास आमंत्रित केले..

अमेरिकेचे राष्ट्रपती ड्वाइट आयजनहावर पण नाराज झाले.

ते म्हणाले की कोणतीही गर्दी अमेरिकेच्या मुलांना शाळेच्या बाहेर ठेवू शकत नाही.

मग त्यांनी लिटिल रॉक मध्ये, सैनिकांना एक नवीन पत्र पाठवले. त्यांचे काम काळ्या विद्यार्थांना सेन्ट्रल हायस्कूलमध्ये जाऊ देणे होते.



दुसऱ्या दिवशी, यूनाइटेड स्टेट्स आर्मी, लिटिल रॉकला पोहचली. बुधवारी सकाळी सैनिकांनी, मिसेज़ बेट्सच्या दरवाज्यावर थाप मारली.

“आम्ही विद्यार्थांच्या साठी तयार आहोत,” ते म्हणाले.



त्यादिवशी विद्यार्थी सैनिकांच्या गाडीत बसून शाळेत गेले.

वर हेलीकॅप्टरांमधून सैनिकांनी गस्त घातली.

प्रत्येक ठिकाणी सैनिक होते.


त्यांनी अर्नेस्ट आणि एलिजाबेथ आणि इतर विद्यार्थांबरोबर शाळेच्या मुख्य दरवाज्यातून आत पाऊल ठेवले.

मिनिजियनने म्हटले की त्यानंतर त्याला एक "अमेरिकी" झालो असे वाटले.

अर्नेस्ट म्हणाला की त्याच्यासाठी ती खूप मोठी गोष्ट होती.

"लिटिल रॉक नाइन" सेंट्रलहायस्कूलच्या समोरच्या दरवाज्यातून आत गेले.

मेल्बाने नंतर म्हटले की त्यावेळी, “पूर्ण देशाने एक मोठे पाऊल उचलले होते.”





समोरची ओळ: थेल्मा मदरशेड, एलिजाबेथ एकफोर्ड, मेल्बा पैटिलो.
पिछली पंक्ति: जेफरसन थॉमस, अर्नेस्ट ग्रीन, मिनिजियन ब्राउन.
कार्लोटा वॉल्स, टेरेंस रॉबर्ट्स, ग्लोरिया रे.

अंतिम शब्द

थोड्या वेळासाठी सैनिक "लिटिल रॉक नाइन"च्या बरोबर त्यांच्या वर्गात गेले. अनेक विद्यार्थांनी त्यांच्याबरोबर चांगला व्यवहार केला किंवा काहींनी त्यांच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. पण काहीजण असेही होते ज्यांना काळी मुळे तिथं आल्याने नाराज होते. ती मुले त्यांच्याबरोबर वाईट वागले.

काही महिन्यानंतर, अधिकांश सैनिक निघून गेले आणि मग परिस्थिती अजूनच खराब झाली. गोऱ्या मुलांनी काळ्या मुलांना शिव्या दिल्या. जेवणाच्या वेळी त्यांनी त्यांच्यावर अन्न फेकले. त्यांनी काळ्या मुलांवर पेन्सिली फेकल्या. त्यांनी त्यांना लाथा मारल्या आणि त्यांची पुस्तके खाली फेकून दिली.

शेवटी ग्रॅज्यूएशन दिवस आला. अर्नेस्ट ग्रीन, सेंट्रल हाईस्कूल मधून पदवी घेणारा पहिला काळा विद्यार्थी झाला. नंतर त्यांनी म्हटले, "मला माहीत होते की मी इथे काय करायला आलो आहे.मी इथे येऊन भिंती तोडल्या."

ती होती वेगळं ठेवण्याची आणि रंग–भेदाची भिंत, जी काळ्या आणि गोऱ्या लोकांना वेगळं करत होती. अर्नेस्ट ग्रीन आणि आठ अन्य विद्यार्थांनी भिंत तोडण्यास मदत केली, ज्यामुळे काळी आणि गोरी मुलं बरोबर शाळेत जाऊ शकले.

पण गवर्नर फॉबस यांना अजूनही ही गोष्ट योग्य वाटत नव्हती.त्यांनी काळ्या आणि गोऱ्या मुलांना एकत्र ठेवण्याच्या ऐवजी १९५८-५९ मध्ये एक वर्ष लिटिल रॉकमधील सर्व शाळा बंद ठेवल्या. काळ्या आणि गोऱ्या विद्यार्थांना शिक्षण घेण्यासाठी इतर पर्याय शोधावे लागले. मेल्बाने आपल्या शाळेचे शेवटचे वर्ष कॅलिफोर्नियात घालवले. आणि मिनिजियन न्यूयॉर्कला गेली. जेव्हा लिटिल रॉक शाळेची १९५९च्या पडझडी नंतर परत उघडली तेव्हा कार्लोटा आणि टेरेंस सेंट्रल हायस्कूल मध्ये आले. बाकी लोक आपल्या जुन्या शाळेत परत गेले. त्या सर्व विद्यार्थांनी आपली पदवी मिळवली आणि कॉलेजनंतर आपापल्या यशस्वी करीयर मध्ये पुढे गेले.

१९८७ मध्ये, "लिटिल रॉक नाइन" सेंट्रल हायस्कूलचा दौरा करण्यासाठी परत आले. यावेळी त्यांचे अभिनंदन करणाऱ्या गर्दीने त्यांना हिरो समजून त्यांचा उत्साह वाढवला.विद्यार्थी संघाची व्यक्ती एक अश्वेत महिला होती.

"लिटिल रॉक नाइन" ने भिंत तोडण्यासाठी मदत केली. आता ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे की आपणही लोकांना वेगळ्या करणाऱ्या भिंती मोडण्यास तयार असलं पाहिजे.

महत्वपूर्ण तिथी

मे १७,१९५४ – अमेरिकी सुप्रीम कोर्टाने घोषणा केली की गोरे-काळे मुलं वेगवेगळ्या शाळेत जाणे ही असंवधानिक आहे.

उन्हाळा १९५७ –सर्व काळी विद्यार्थांच्या शाळांना सेंट्रल हायस्कूल मध्ये जाण्यासाठी १७ विद्यार्थांची निवड केली. ऑगस्ट पर्यंत ती यादी नऊ पर्यंत गेली.

२ सप्टेंबर १९५७ (श्रम दिवस) - गवर्नर फॉबसने सेंट्रल हायच्या जवळ सैनिक तैनात केले.

३ सप्टेंबर १९५७ काळ्या विद्यार्थांना शाळेच्या पहिल्या दिवशी घरीच राहायला सांगितले.

४ सप्टेंबर १९५७ काळ्या विद्यार्थांना दूर ठेवले कारण ते सेंट्रल हाय मध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होते.

२३ सप्टेंबर १९५७ काळ्या विद्यार्थांना शेजारच्या दरवाज्यातून आत प्रवेश मिळवला.पण पोलीस त्यांना सुरक्षेच्या कारणाने घरी घेऊन गेले..

२४ सप्टेंबर १९५७ लिटिल रॉक मध्ये अमेरिकी सैनिक पोहचले.

२५ सप्टेंबर १९५७ - "लिटिल रॉक नाइन" ने अमेरिकी सैनिकांबरोबर समोरच्या दरवाज्यातून आत प्रवेश केला.

२७ मे १९५८ —अर्नेस्ट ग्रीनने, सेंट्रल हाय मधून पदवीशिक्षण पूर्ण केले.